आरोग्य अधिकारी कार्यालय
आरोग्य विभाग
जा.क्र.:- पुच/आ/५६३०
दिनांक:- २६/०८/२०२५

कार्यालयीन परिपत्रक

सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.

विषय:- एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत को - ब्रँडेड आयुष्मान कार्ड निर्माणाची विशेष मोहीम राबविणेबाबत.

संदर्भ:- मा. विरेंद्रसिंह सचिव (२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग नवीन मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १३/०८/२०२५ रोजीचे पत्र.

वरील विषयांकीत प्रकरणी तसेच संदर्भाकित पत्रान्वये एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत को- ब्रँडेड आयुष्मान कार्ड निर्माणाची विशेष मोहीम १६ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान राबविण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. सदर मोहीम राबविण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून सदर सूचनेच्या अधीन राहून दिनांक १६ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान राबविण्याबाबत सूचित केले होते. दि. २६/०८/२०२५ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार सदर मोहिमेचा कालावधी दि. ०८/०९/२०२५ पर्यंत वाढविण्यात आला आहे. नमूद केलेली मोहीम आपल्या कार्यक्षेत्रामध्ये राबवून जास्तीत जास्त को - ब्रँडेड आयुष्मान कार्ड निर्माण करण्याबाबत तुमच्या स्तरावरून योग्य ते नियोजन व कार्यवाही करण्यात यावी. आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे को - ब्रँडेड आयुष्मान कार्ड काढण्यात यावेत. त्याबाबतचा लेखी अहवाल पुणे महानगरपालिकेच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, कार्यालयाकडे (pmcnhm1@gmail.com) या ईमेलवर पाठविण्यात दि. ०९/०९/२०२५ पर्यंत पाठविण्यात यावा.

तरी संबंधित विषयाच्या अनुषंगाने आपल्याकडील अडचणी, शंका, समस्या इ. चे निराकरण करणेस्तव संबंधित परिमंडळ वैद्यकीय अधिकारी / क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांचेशी संपर्क करून पुढील कार्यवाही करावी.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

सोबत:- संदर्भांकित पत्र

सत्यमेव जयते
विरेंद्र सिंह
सचिव (२)

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
१०वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कॉम्प्लेक्स बिल्डींग,
ए विंग, एस. बी. मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
☎ ०२२-२२६१७३९२/९७
✉ psec2.pubhealth@maharashtra.gov.in

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Public Health Department
10th Floor, G/T. Hospital Complex Building,
A Wing, L.T. Marg, New Mantralaya, Mumbai- 400 001
☎ 022-22817302/97
✉ psec2.pubhealth@maharashtra.gov.in

PHD/37/2025-MJPJAY/AB-PMJAY

दिनांक 13.08.2025

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषय : एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत "को ब्रँडेड आयुष्मान कार्ड निर्माणाची विशेष मोहीम दिनांक १६ ऑगस्ट, २०२५ ते ३१ ऑगस्ट,२०२५ " दरम्यान राबविणे बाबत...

महोदया/ महोदय,

माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी वॉर रूम बैठकीत महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना "आयुष्मान कार्ड" वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत.

अ) या कामकाजासंदर्भातील सद्यस्थितीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **आयुष्मान कार्ड निर्माणाची सद्यस्थिती :** आयुष्मान कार्ड निर्माणाचे (eKYC) राज्याचे सरासरी साध्य प्रमाण ३३% इतके आहे. याची जिल्हानिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्र -१ मध्ये नमूद केली आहे.
२. **आयुष्मान कार्ड वितरणाची सद्यस्थिती :** आयुष्मान कार्ड वितरणाचे राज्याचे सरासरी साध्य प्रमाण १७% इतके आहे. याची जिल्हानिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्र - २ मध्ये नमूद केली आहे.
३. **वय वंदना कार्ड निर्माण सद्यस्थिती :** राज्यातील ७० वर्षे व अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता वय वंदना कार्ड निर्माण आणि वितरण यासाठी निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांपैकी राज्याचे सरासरी साध्य प्रमाण ५% इतके आहे. याची जिल्हानिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्र -३ मध्ये नमूद केली आहे.
४. **कार्ड निर्माणासाठी क्षेत्रीय कर्मचारी यांचे लॉगिन निर्माण :** आयुष्मान कार्ड निर्माण (eKYC) आणि वितरणाचे काम सर्व जिल्ह्यातील आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानदार आणि आपले सरकार सेवा केंद्र यांचेवर सोपविण्यात आले आहे. त्यांच्या जिल्हानिहाय कार्यान्वित करण्यात आलेल्या लॉगिनची माहिती सोबतच्या विवरणपत्र - ४ मध्ये नमूद केली आहे.
५. **कार्ड निर्माणासाठी आधारभूत माहितीचे अद्ययावतीकरण :** आयुष्मान कार्ड निर्माण (eKYC) करण्याचे कामकाज राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या (NHA) Beneficiary Identification System (BIS) पोर्टलवरून करण्यात येते. सदर योजनेचे लाभ कुटुंब आधारित असल्याने eKYC करण्यासाठी राज्याची रेशनकार्डची माहिती आधार क्रमांकाच्या माहितीसह वापरली जाते. सद्यस्थितीत अन्न व नागरी पुरवठा विभागाकडील रेशनकार्डचा सुधारित डेटा एन आय सी मार्फत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या BIS पोर्टलवर माहे जुलै २०२५ मध्ये अद्ययावत करण्यात आला आहे. त्यामुळे कार्ड निर्माणातील अडचणी दूर झाल्या आहेत.

मुलगी वाचवा
Save the girl child

जन्म व मृत्युची नोंदणी करा.
REGISTER ALL BIRTHS AND DEATHS

Scanned with OKEN Scanner

६. **कार्ड निर्माण (eKYC) करण्यास शिल्लक लाभार्थ्यांची माहिती :** आयुष्मान कार्ड साठी eKYC न झालेल्या शिल्लक लाभार्थ्यांची जिल्हा, तालुका आणि गाव निहाय माहिती सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाना उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी **सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वतंत्र लॉगिन आय डी** तयार करून राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या दिनांक २१.०७.२०२५ रोजीच्या पत्राने पाठविण्यात आले आहेत.

७. **कार्ड वाटप करण्यातील अडचणी दूर करणे :** विशेषत: नागरी भागात अपूर्ण पत्त्यामुळे कार्ड वितरण होत नसल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिका, नागपूर महानगरपालिका,अमरावती महानगरपालिका आणि कोल्हापूर महानगरपालिका यांनी निदर्शनास आणून दिली होती. त्यांचेकडून अशा कार्डचे क्रमांक प्राप्त करून घेऊन रेशनकार्ड डेटा मधील पत्ते त्यांना पुरविण्यात आले आहेत. त्याआधारे कार्ड वितरण पूर्ण करता येणार आहे. याबाबत सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनाही राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या दिनांक २५.०७.२०२५ रोजीच्या पत्राने स्वतंत्रपणे सूचना देण्यात आल्या आहेत.

८. **शासकीय आणि निमशासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय, आशा आणि अंगणवाडी कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय, SMILE तसेच NAMASTE योजनेचे लाभार्थी यांच्या कार्ड निर्माण आणि वितरण यांचे उद्दिष्ट पूर्ण करणे :** याबाबतची माहिती सोबतच्या विवरणपत्र - ५ ते ८ मध्ये नमूद केली आहे. या बाबींची मोहीम कालावधीत उद्दिष्टपूर्ती करून स्वतंत्र अहवाल द्यावयाचे आहेत.

ब) या मोहिमेची कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत :

i) दिनांक १६ ऑगस्ट,२०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत आयुष्यमान कार्ड निर्माण आणि वितरण याबाबत विशेष मोहीम जिल्हाधिकारी यांच्या संनियंत्रणाखाली आणि आयुक्त, महानगरपालिका तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा यांच्या समन्वयातून राबविण्यात यावी.

ii) मोहिम कालावधीत प्रत्येक गावात/शहरातील प्रभागात आयुष्मान कार्ड निर्माण करण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात यावीत. त्याशिवाय गावातील/शहरातील वॉर्डातील उर्वरित लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यासाठी आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानचालक व आपले सरकार सेवा केंद्र यांनी संपूर्ण मोहिम काळात लाभार्थ्यांशी संपर्क साधून आणि घरी भेट देवून कार्ड निर्माणाचे १०० % उदिष्ट पूर्ण करावे.

iii) कार्ड निर्माण करण्यासाठी शिल्लक लाभार्थ्यांची माहिती जिल्हा, तालुका व गावनिहाय सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे यासाठी त्यांना स्वतंत्र लॉगिन आयडी देण्यात आले आहेत. या माहितीच्या आधारे प्रत्येक आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानदार आणि आपले सरकार सेवा केंद्र यांना मोहिम काळात पूर्ण करावयाच्या कार्ड निर्माणाचे उदिष्ट देण्यात यावे आणि त्यांना शिल्लक लाभार्थ्यांच्या याद्या मोहिमे अगोदर देण्यात याव्यात. याप्रमाणे लेखी आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

iv) क्षेत्रीय कर्मचारी (आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानचालक आणि आपले सरकार सेवा केंद्र) यांच्या लॉगीनद्वारे सलग एक आठवडा एकही eKYC न झाल्यास असे लॉगिन NHA कडून बंद करण्यात येते. ही बाब विचारात घेता क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मोहीम कालावधीत दैनिक कामावर पर्यवेक्षण ठेवावे.

Scanned with OKEN Scanner

v) कार्ड निर्माण करण्यासाठी लाभार्थी Beneficiary Login द्वारे स्वतःच स्वतःचे आयुष्मान कार्ड तयार करू शकतो आणि प्रिंट घेऊ शकतो. यासाठीची क्रमवार कार्यपद्धती, पोर्टल, मोबाईल ॲप यांची माहिती सोबत पाठविण्यात येत आहे. यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. त्याशिवाय आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानचालक आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे क्षेत्रीय कर्मचारी यांच्या लॉगिनद्वारे कार्ड निर्माण करून घेता येते याबाबीसही प्रसिद्धी द्यावी. याशिवाय अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र यांना Beneficiary Login द्वारे कार्ड निर्माण करण्याबाबत स्वतंत्रपणे सूचना देण्यात आल्या आहेत. या तिन्ही पध्दतीचा जास्तीत जास्त अवलंब केला जाईल याबाबत नियोजन करावे.

vi) शासकीय आणि खाजगी अशा सर्व अंगीकृत रुग्णालयांनी दरमहा किमान एक यशस्वी आरोग्य शिबिर घेणे बंधनकारक आहे. मोहीम कालावधीत अशा सर्व रुग्णालयांमार्फत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करावीत आणि त्यामध्ये रुग्ण तपासणी बरोबरच जास्तीत जास्त लोकांचे आयुष्मान कार्ड तयार करण्यात यावेत. यासाठीही रुग्णालयांना उदिष्ट देण्यात यावेत.

vii) या मोहिमेस व्यापक पूर्व प्रसिद्धी देण्यात यावी तसेच ग्राम पातळीपासून वरिष्ठ पातळीपर्यंत सर्व लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग मिळावा यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. त्याशिवाय महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक संघ, स्वयंसेवी संस्था यांचेही सहाय्य घेण्यात यावे.

viii) मोहिमे दरम्यान उत्कृष्ट काम करणाऱ्या आशा सेविका, स्वस्त धान्य दुकानचालक, आपले सरकार सेवा केंद्र, आरोग्य मित्र, सरपंच, ग्राम पातळीवरील शासकीय अधिकारी व कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक संघ, स्वयंसेवी संस्था इत्यादी यांचा प्रशस्तीपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात यावा. तसेच, गावातील ७० वर्षावरील सर्व नागरिकांचे वय वंदना कार्ड १०० % पूर्ण करणाऱ्या आणि इतर लाभार्थ्यांचे १००% कार्ड पूर्ण करणाऱ्या गावांचाही गौरव करण्यात यावा. असे कार्यक्रम मोहिम पूर्ण झाल्यानंतर जिल्हास्तरावर दि १ सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यानंतर तात्काळ आयोजित करण्यात यावेत.

ix) ७० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता केंद्र शासनाच्या वय वंदना योजनेद्वारे कुटुंबासाठी असणाऱ्या पाच लक्ष प्रतिवर्ष लाभाव्यतिरिक्त अधिकचे रु. पाच लक्ष प्रतिवर्ष पर्यंतचे लाभ मिळणार आहेत. यासाठी अशा सर्व लाभार्थ्यांचे वय वंदना कार्ड तयार करणे आवश्यक आहे. वय वंदना कार्ड तयार करण्याची कार्यपद्धती अतिशय सोपी असून फक्त आधार कार्ड आणि आधार संलग्न मोबाईल क्रमांक या आधारे वय वंदना कार्ड तयार करता येते. या कामी ज्येष्ठ नागरिक संघ तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांचे सहकार्य घेता येईल. ***या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करताना होमपेजवर थेट "For Senior Citizens of the age of Seventy years & above - CLICK HERE TO ENROLL" येथूनच कार्ड निर्माणची सुरुवात करावी जेणेकरुन प्रत्यक्ष लाभ घेताना त्यांना केंद्र शासनाच्या विशिष्ठ योजनेचे लाभार्थी म्हणून लाभ मिळू शकतील.***

Scanned with OKEN Scanner

x) सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय हे सुद्धा राज्याच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रुपये ५ लक्ष प्रती कुटुंब प्रतिवर्ष आरोग्य विषयक लाभ मिळण्यास पात्र आहेत. यासाठी सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे तसेच आप्तस्वकीयांचे आयुष्मान कार्ड Beneficiary Login मधून निश्चित कालावधीत निर्माण करावे यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयाने आदेश निर्गमित करावेत आणि त्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे संकलित करून सादर करावी.

xi) आशा, अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी सहायक यांचे आयुष्मान कार्ड मोहीम स्वरूपात पूर्ण करण्याबाबत यापूर्वीच सूचना देण्यात आल्या होत्या. यातील शिल्लक लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण या मोहिमेत पूर्ण करून घ्यावे. *या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करताना "Sub Scheme- ASHA किंवा AWW-AWH" हा पर्याय न चुकता निवडावा जेणेकरुन प्रत्यक्ष लाभ घेताना त्यांना केंद्र शासनाच्या विशिष्ट योजनेचे लाभार्थी म्हणून लाभ मिळू शकतील.*

xii) सफाई कर्मचारी यांच्यासाठी असणाऱ्या केंद्र शासनाच्या नमस्ते योजनेच्या उद्दिष्टानुसार सर्व सफाई कर्मचारी यांचे आयुष्मान कार्ड निर्माण या मोहिमेत पूर्ण करून घ्यावे. *या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करताना "Scheme- NAMASTE" हा पर्याय न चुकता निवडावा जेणेकरुन प्रत्यक्ष लाभ घेताना त्यांना केंद्र शासनाच्या विशिष्ट योजनेचे लाभार्थी म्हणून लाभ मिळू शकतील.*

xiii) AB- PMJAY SMILE - Transgender Swasthya Suraksha Scheme या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड मोहीम स्वरूपात पूर्ण करावेत. यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेता येईल. *या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करताना "Scheme- SMILE" हा पर्याय न चुकता निवडावा जेणेकरुन प्रत्यक्ष लाभ घेताना त्यांना केंद्र शासनाच्या विशिष्ट योजनेचे लाभार्थी म्हणून लाभ मिळू शकतील.*

xiv) सदर मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हा पातळीवर राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी द्यावी तसेच याची माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीस पाठवावी जेणेकरून अशा यशस्वी उपक्रमांचे अन्य जिल्ह्यात अनुकरण करता येईल.

xv) **मोहिमेअंती राज्यस्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्ह्यांचा तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांचा राज्यस्तरीय कार्यक्रमांमध्ये यथोचित गौरव करण्याचे नियोजन आहे.**

वरील प्रमाणे आयुष्मान कार्ड निर्माण आणि वितरण याबाबतची विशेष मोहीम दिनांक १६ऑगस्ट, २०२५ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत राबविण्यात यावी आणि महाराष्ट्रातील उर्वरित सर्व लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण होईल याबाबत नियोजन करावे. मोहिमेचा फलित अहवाल म्हणून सोबतच्या सर्व विहित विवरण पत्रातील माहिती अद्यावत करून दिनांक ०५ सप्टेंबर,

Scanned with OKEN Scanner

२०२५ पर्यंत या कार्यालयास तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयास पाठविण्यात यावी, या संदर्भात अधिक माहितीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याशी संपर्क साधावा, अशी विनंती आहे.

आदरपूर्वक,

आपका हस्ताक्षरित

(विरेंद्र सिंह)

प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाही करिता


१. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
२. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
३. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
४. वैदयकीय आरोग्य अधिकारी महानगरपालिका (सर्व)

Scanned with OKEN Scanner

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

१३५६	प्रति कुटुंब, प्रति वर्ष ₹ ५ लाख	२३००
उपचार व शस्त्रक्रिया	आरोग्य संरक्षण	पेक्षा जास्त शासकीय व खाजगी रुग्णालये

Beneficiary लॉगिनमधून मोबाईल ॲपद्वारे / पोर्टलद्वारे स्वत:च आपले आयुष्मान कार्ड तयार करा



कार्ड तयार करण्याकरीता -

- गुगल प्ले स्टोरमधील Ayushman App मधील Beneficiary पर्याय निवडा किंवा https://beneficiary.nha.gov.in / या पोर्टलला भेट द्या
- आपला मोबाईल क्रमांक, कैप्चा व मोबाईल OTP च्या सहाय्याने लॉगिन करा
- आपले राज्य, योजना, जिल्हा निवडा व आधार क्रमांकाच्या आधारे कुटुंबाचा तपशील प्राप्त करा
- ज्या लाभार्थ्याची ई-केवायसी करायवाची आहे त्याच्या नावासमोरील ई-केवायसी पर्यायावर क्लिक करा
- आधार OTP च्या सहाय्याने आधार प्रमाणीकरणाची प्रक्रीया पूर्ण करा
- फोटो कॅप्चर करा, अतिरीक्त माहिती भरा व सबमिट बटणवर क्लिक करा
- आपला आधार व रेशनकार्ड तपशील ८० टक्केपेक्षा जास्त जुळत असेल तर आपले कार्ड तात्काळ मंजूर होईल अन्यथा कार्ड मंजुरी संस्थांकडे मंजुरीसाठी पाठविले जाईल. कार्ड मंजुरी संस्था १ ते २ दिवसात आपले कार्डवर प्रक्रिया करतील
- कार्ड मंजुर झाल्यानंतर आपण कार्ड डाऊनलोड करू शकता

आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा	आयुष्मान ॲप	पोर्टल
१. अद्ययावत शिधापत्रिका २. आधार कार्ड ३. आधारशी जोडलेला मोबाईल		

१५५ ३८८ / १८०० २३३२ २०० / १४५५५ / १८०० ११९ ५६५

pmjay.gov.in / www.jeevandayee.gov.in

Scanned with OKEN Scanner